सकाळ

# 'रवळनाथ हौसिंग'ची 'सहकार ठेव' योजना



एम. एल. चौगुले

कुडाळ, ता. २३ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने ६९ व्या अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त खास महिला व आजी-माजी सैनिकांसाठी 'सहकार ठेव' योजना सुरू केली आहे. १८ महिने मुदतीच्या या योजनेची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर असून त्याचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले आहे.

चौगुले म्हणाले, सध्या संस्थेत ३६५ कोटींच्या ठेवी आहेत. घरबांधणी व प्लॉट खरेदीसाठी २५१ कोटींची कर्जे वितरित करण्यात आली आहेत. एकूण १३४ कोटींची गुंतवणूक असून सर्व ठेवी आणि कर्जे सुरक्षित आहेत. संस्थेच्या अर्थसहाय्यातून आजअखेर ३३८० घरे साकारण्यात आली आहेत. त्यांपैकी २५० पेक्षा अधिक घरे सैन्यदलातील जवान व पोलिसांची आहेत.

महिला व सैनिकांना घरबांधणीसाठी प्राधान्याने व सवलतीच्या व्याजदरात कर्जपुरवठा केला जातो. त्यांच्या ठेवींनाही चांगले व्याज मिळावे, म्हणूनच ही योजना सुरू केली आहे. केवळ नवीन ठेवींसाठीच हा व्याजदर लागू असून गरजेनुसार त्यावर ठेवतारण कर्ज ही घेता येईल. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी आपल्या नजीकच्या शाखेत संपर्क साधावा, असे आवाहन चौगुले यांनी केले आहे.

Sindhudurg, Sindhudurg-Today
24/11/2022 Page No. 4